**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २७ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर, नागपूर विभागाचा निकाल 94.73 टक्के.**
2. **पुण्याच्या पोर्शे कार अपघात प्रकरणात ससून रुग्णालयाच्या दोन डॉक्टरांना अटक.**
3. **नागपूर शहरातील खड्डे बुजविण्यासाठी अत्याधुनिक इन्स्टा रोड पॅचर मशीन मशीनच्या कार्यप्रणालीचे मनपा आयुक्तांपुढे प्रात्यक्षिक.**

**आणि**

4. **विदर्भात अकोला, चंद्रपूर, यवतमाळ मध्ये परवा पर्यंत उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट तर नागपूर, अमरावती मध्ये उष्णतेचा आज येलो अलर्ट.**

*****

दहावीचा निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. दहावीचा यंदाचा एकूण निकाल 95.81 टक्के इतका लागला आहे. यंदाच्या निकालामध्ये कोकण विभागानं बाजी मारली आहे. नागपूर विभाग 94.73 टक्केवारीनुसार सर्वात कमी आहे. तर निकालांमध्ये पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल 97.21 टक्के तर मुलांचा निकाल 94.56 टक्के लागला आहे. आकडेवारीनुसार, सर्वच विभागांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे. एकूण 72 विषयांपैकी 18 विषयांचा निकाल 100 टक्के लागला आहे. दरम्यान, दहावीच्या परीक्षेला

बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांच्या निकालाची एकूण टक्केवारी 94.86 टक्के इतकी आहे. कोकण विभागाचा निकाल 99.01 टक्के लागला आहे. नागपूर विभागाचा निकाल 94.73 टक्के; छत्रपती संभाजीनगर 95.19 टक्के; मुंबई 95.83 टक्के; कोल्हापूर 97.45 टक्के, अमरावती 95.58 टक्के; नाशिक 95.28 टक्के; लातूर 95.27 टक्के आणि पुणे विभागाचा निकाल 96.44 टक्के लागला आहे.

नागपूर विभागात १ लाख ५१ हजार २ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, यापैकी १ लाख ४९ हजारांवर विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली यात ३८ हजारांवर विदयार्थ्यांनी प्राविण्यासह ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण घेतले आहे. गडचिरोली जिल्ह्याचा निकाल ९४.६७ टक्के इतका लागला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा टक्का वाढला असला; तरी नागपूर विभागात मात्र जिल्ह्याची चौथ्या स्थानी घसरण झाली आहे. दहावीच्या नियमित परीक्षेसाठी यंदा राज्यातल्या नऊ विभागीय मंडळातून १५ लाख ४९ हजार ३२६ नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४ लाख ८४ हजार ४४१ जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा यंदा १ पूर्णांक ९८ टक्क्यांनी निकाल वाढला आहे अशी माहिती राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पंडित जवाहरलाल नेहरू -पुण्यतिथी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या ६०व्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना समाजमाध्यमावरील संदेशातून आदरांजली वाहिली आहे. नवी दिल्लीतल्या शांतीवन या पंडित नेहरूंच्या समाधीस्थळी जाऊन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे,पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी आदरांजली वाहिली. आधुनिक भारताचे

शिल्पकार असणाऱ्या पंडित नेहरूंच्या योगदानाशिवाय भारताचाइतिहास पूर्ण होऊ शकत नाही. देशाला वैज्ञानिक, आर्थिक, औद्योगिक आणि इतर क्षेत्रांत अग्रेसर बनवण्याचं आणि लोकशाहीच्या रक्षणाचं कार्य त्यांनी केलं, असं खर्गे यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

राष्ट्रवादी बैठक

निवडणूक ही कार्यकर्त्यांची परीक्षा असून निवडणुकीच्या विजयाचा कोणीही उन्माद करू नये आणि पराभवाने खचूनही जाऊ नये. कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो त्याला जपले गेले पाहिजे असे सांगतानाच आता विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी पक्षाच्या बैठकीत आज केले. राष्ट्रवादी काँग्रेसची राज्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठक गरवारे क्लब हाऊस इथ पार पडली. पवार म्हणाले, येत्या १० जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २५ वा वर्धापनदिन असून यानिमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात विविध कार्यक्रम राबवावेत. अल्पसंख्याक समाजासाठी सर्वाधिक चांगले निर्णय हे महायुती सरकारच्या काळात घेतले आहेत. शिव - फुले - शाहू - आंबेडकरांची विचारधारा ही आपल्या पक्षाचा मूळ गाभा असून कितीही मोठी किंमत मोजावी लागली तरी आम्ही ही विचारधारा सोडणार नाही, अशी भूमिका अजितदादा पवार यांनी स्पष्ट केली.प्रफुल्ल पटेल म्हणाले, येणारी विधानसभा निवडणूक आपणा सर्वांसाठी महत्त्वाची असून त्यावर आपण सर्वांनी लक्ष केंद्रीत केले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय दर्जा आपल्याला परत मिळवायचा आहे आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा विस्तार देशभरात करायचा असल्याचा निर्धार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला.

पदवीधर मतदारसंघ निवडणुक

राज्यात विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या होणार असलेल्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब यांना तर मुंबई शिक्षक मतदारसंघातून जे. एम. अभ्यंकर यांना पक्षानं उमेदवारीदिली आहे. विधानपरिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं अभिजित पानसे यांना उमेदवारी दिली आहे. मनसे नेते आणि सरचिटणीस शिरीष सावंत यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारेही माहिती दिली आहे.

पोर्श कार अपघात

पुण्याच्या कल्याणी नगर भागात झालेल्या पोर्श कार अपघात प्रकरणात पुणे पोलिसांनी ससून रुग्णालयाच्या दोन डॉक्टरांना अटक केली. न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख डॉ.अजय टावरे आणि डॉ.श्रीहरी हरलोर यांच्यावर अल्पवयीन आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोप आहे. १९ मे रोजी रात्री या आरोपीनं नशेच्या अंमलाखाली भरधाव वेगानं कार चालवून दोन अभियंत्यांचे बळी घेतले. या आरोपीच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले होते. त्यात या डॉक्टरांनी फेरबदल केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

मंत्रालय कर्मचारी निधन

नोएडा इथं भरधाव कारनं दिलेल्या धडकेत आकाशवाणीचे निवृत्त कर्मचारी 64 वर्षीय जनक देव शहा यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध तक्रार दाखल केली असून पोलीस तपास करत आहेत. जनक देव शहा यांच्या निधनाबद्दल आकाशवाणीच्या महासंचालकांनी शोक व्यक्त केला आहे.

इन्स्टा रोड पॅचर

नागपूर शहरातील डांबरी रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी अत्याधुनिक इन्स्टा रोड पॅचर मशीनची पाहणी आज मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी केली. हिस्लॉप कॉलेज समोरील रस्त्यावर मशीनचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पावसाळ्यात डांबरी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले निदर्शनास येतात. हे खड्डे जलद प्रभावाने बुजविता यावेत याद्दष्टीने इन्स्टा रोड पॅचर मशीनचा उपयोग होणार आहे. छोटे आणि मोठे सर्व प्रकारचे खड्डे बुजविण्यास मशीनचा उपयोग होतो. विशेषत: पावसाळ्यामध्ये मशीनमुळे खड्डे बुजविण्यास फायदा होतो.मशीनचे तंत्रज्ञान पर्यावरणपूरक आहे. दोन वेगवेगळ्या मशीनच्या माध्यमातून कमीत कमीत वेळेत दोन खड्डे दुरुस्त करण्याचे प्रात्यक्षिक मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्यापुढे दाखविण्यात आले.

हवामान

नागपूरच्या हवामान खात्यानं वर्तविलेल्या अंदाजानुसार आज अकोला चंद्रपूर यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला असून नागपूर आणि अमरावती जिल्ह्याच्या तुरळ ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट घोषित करण्यात आला आहे. उद्या अकोला चंद्रपूर आणि यवतमाळ तसेच परवा अकोल्यात उष्णतेचा ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला आहे. मागील २४ तासांत सर्वात जास्त तापमान हे यवतमाळ इथं 46 अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले आहे. त्या खालोखाल अकोला इथं ४५ पूर्णांक २ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलं. तर नागपूरमध्ये तापमान ४२ पुर्णांक ४ अंश सेल्सिअस होतं. दरम्यान, अमरावती आणि बुलढाणा इथं आज तुरळ ठिकाणी विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, बुलढाणयात गारपीटीची शक्यता देखील

वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आगामी काही तासात विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, अमरावती, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

रवींद्र शोभणे सत्कार

साहित्य क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार 97व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांना प्राप्त झाल्याबद्दल विविध संस्थांच्यावतीनं काल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, यावेळी त्यांच्या साहित्यावर आधारित 'सक्षम समीक्षा' विशेषांकाचं मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं. विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते होते तर प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गिरीश गांधी, यांची उपस्थिती होती.

*******